

श्री. जयवंत महादेव पाटील
मु: मुरुक्टे, पो: मानवळे
ता: भुदरगड, जि: कोल्हापूर
13 Feb, 2018

प्रति,
माननिय व्यवस्थापक,
उमराव ट्रस्ट,
मीरा रोड, मुंबई

महोदय,

नमस्कार. साहेब, मी जयवंत महादेव पाटील. माझा मुलगा अमित पाटील याच्या ऑपरेशनसाठी आपण जी मदत दिली ही माझ्यासाठी अनमोल आहे. मी आज माझं पिवळे रेशनकार्ड घेवून आमदार निधीतून किंवा खासदार निधीतून मला मदत मिळेल का? पाहत होतो पण कुठूनही मदत मिळाली नाही. उलट तुम्ही स्वत: डॉ काशीकर सरांशी बोलता बोलता स्वत: हून मदत केली. आमच्यासाठी तुम्ही देवमाणूसच आहात. तुम्ही जी मदत केली आहे ती मी व माझे कुटुंब शेवटच्या श्वासापर्यंत स्मरणात ठेवू. मी आपला नेहमीच ऋणी राहीन.

मी आपल्यासाठी ईश्वरचरणी प्रार्थना करतो की आपल्याला निरामय आयुष्य लाभू दे. व असेच अतिसामान्य गरजवंताला तुमच्याकडून मदत लाभू दे. आणि अनंत शुभेच्छा तुम्हास मिळाव्यात. हे ऋण व्यक्त करण्यासाठी माझ्याकडे शब्दच अपुरे पडत आहेत. आजच्या माझ्या परिस्थितीमुळे नियतीने मला माणसातील देवाची आणी देवासारख्या डॉ. काशीकर सरांची भेट घडवून दिली.

मी आपला खुप खुप आभारी आहे.

आपला विश्वासू
जयवंत महादेव पाटील
(वडील)